**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१
ईमेल :- rdd.est4-mh@mah.gov.in

---

क्रमांक: संकीर्ण-२०२५/सं.क्र.२००/आस्था -४ दिनांक:- ०८.१०.२०२५

प्रति,

१) अपर आयुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्ह परिषद, (सर्व)

विषय:- विस्तार अधिकारी (पंचायत) या संवर्गाच्या आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मिळणा-या लाभाबाबत

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी (पंचायत) संघटना यांचे दिनांक ३०.०९.२०२५ रोजीच्या निवेदनाची प्रत सोबत जोडली आहे.

२. उक्त निवेदनान्वये संघटनेने दिनांक २४.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत अधिकारी पदावरुन (सेवाज्येष्ठतेद्वारे/विभागीय परीक्षेद्वारे) पदोन्नती झालेले विस्तार अधिकारी (ज्यांची दोन्ही पदावरील एकूण सेवा ३० वर्षे किंवा त्याहून अधिक झालेली आहे.) अशा विस्तार अधिकारी यांना आ. प्र. यो. चा तिसरा लाभ एस-१५/एस-१६ वेतनश्रेणीचा मिळत असून ग्रामपंचायत अधिकारी यांना आ. प्र. यो. अंतर्गत तिसरा लाभ एस-२० वेतनश्रेणीचा मिळत असल्याबाबत नमूद केले आहे.

३. तरी संघटनेने उपस्थित केलेल्या मुद्यानुसार आपल्या अधिनस्त (तत्कालीन ग्रामसेवक) ग्रामपंचायत अधिकारी पदावरुन (सेवाज्येष्ठतेद्वारे/विभागीय परीक्षेद्वारे) पदोन्नती झालेले विस्तार अधिकारी (पंचायत) यांना एकूण सेवा ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतर सद्यस्थितीत देण्यात येणारा लाभ व (तत्कालीन ग्रामसेवक) ग्रामपंचायत अधिकारी यांना सुधारीत सेवांतर्गत आ. प्र. यो. अंतर्गत देण्यात येणा-या लाभामध्ये तफावत आहे किंवा कसे, याबाबत सद्यस्थितीदर्शक माहिती कागदपत्रांसह दिनांक १५.१०.२०२५ रोजी सायंकाळी पर्यंत सादर करावी.

(दिपाली पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

निवडनस्ती (आस्था-४)

नोंदणी क्र.: NGP 3605 अमरावती

# महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी (पंचायत) संघटना

email id : Ipomaharashtra@gmail.com

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री. प्रविण गावंडे | श्री. श्रीधर सातप | श्रीम. उज्वला बने | श्रीम. मिनाक्षी बनगोड | श्री. रामप्रसाद मुंढे | श्री. बालाजी पोतदार |
| राज्याध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य कोषाध्यक्ष | राज्य सरचिटणीस |
| मो. 9921441869 | मो. 9423082078 | मो. 9892209863 | मो. 9422152500 | मो. 8668275541 | मो. 8275454488 |

पत्र व्यवहाराचा पत्ता : श्री. प्रविण गावंडे, प्लॉट नं. ८, खरबी रोड, गावंडे कॉन्व्हेंट जवळ, साईबाबा नगर, पंजाब नॅशनल बँक समोर, नागपूर (महाराष्ट्र)- 440034

**कार्याध्यक्ष**
श्री वसंत वाघमारे (नांदेड)

**संघटक**
श्री इंद्रजित काळे(ठाणे)

**लेखा परिक्षक**
श्री ज्ञानेश्वर सुतार (सोलापूर)

**विभागीय अध्यक्ष**
श्री गजानन धर्माळे (अमरावती)
श्री नरेंद्र नागलवाड (छ.सं.नगर)
श्री प्रसाद म्हात्रे (कोकण)
श्री प्रभाकर वाघ (नागपूर)
श्री कपिल वाघ (नाशिक)
श्री सुकदेव साळुंके (पूणे)

**विभागीय सचिव**
श्री भोजराज पवार (अमरावती)
श्री व्ही.बी.कांबळे (छ.सं.नगर)
श्री सुनिल पाटील (कोकण)
श्री शितेज पटले (नागपूर)
श्री पुलकेशी केदार (नाशिक)
श्री माधव बोईनवाड (पूणे)

**विभागीय संघटक**
श्री प्रमोद लोखंडे (अमरावती)
श्री मंगेश कुंटे (छ.संभाजीनगर)
श्री गजानन बडद (कोकण)
श्री सुनिल गावंडे (नागपूर)
श्री डी.जी. सपकाळे (नाशिक)
श्री मनोज जाधव (पूणे)

जा. क्र. 15/2025 दिनांक : 30.09.25

प्रति,
मा प्रधान सचिव सो,
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन,मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई.

विषय – विस्तार अधिकारी (पं) संवर्गाची वेतन त्रुटी दूर करणे बाबत..

संदर्भ – महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि 24 सप्टेंबर 2024.

महोदय,

उपरोक्त विषयी सविनय सादर की, संदर्भ क्र 1 मधील शासन निर्णयानुसार शासनाने ग्रामविकास विभागासाठी निम्न स्तरावर अतिशय महत्वपूर्ण काम करणा-या ग्रामपंचायत अधिकारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत 10 वर्षाच्या सेवेनंतर पहिला लाभ विस्तार अधिकारी पं S 14(38600-122800),20 वर्षाच्या सेवेनंतर दुसरा लाभ सहायक गट विकास अधिकारी S 15 (41800-132300) व 30 वर्षाच्या सेवेनंतर तिसरा लाभ गट विकास अधिकारी S 20 (56100-177500) मंजूर करण्याचा अतिशय स्वागतार्ह निर्णय घेतला याचा आनंद आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेमधील पंचायत विभागाची सद्याची प्रशासकीय रचना पाहता, ग्रामपंचायत अधिकारी – विस्तार अधिकारी (पं) – सहायक गटविकास अधिकारी - गटविकास अधिकारी असा पदांचा चढता क्रम आहे. त्यानुसार विस्तार अधिकारी (पं) हे पद ग्रामपंचायत अधिकारी या पदावरून पदोन्नतीने व सरळ सेवेद्वारे भरले जाते. याचाच अर्थ विस्तार अधिकारी (पं) हे पद ग्रामपंचायत अधिकारी या पदापेक्षा वरिष्ट दर्जाचे आहे.

तथापि, सद्यस्थितीत ग्रामपंचायत अधिकारी पदावरून पदोन्नत झालेले सेवाजेष्ट विस्तार अधिकारी (ज्यांची दोन्ही पदावरील एकूण सेवा 30 वर्षे किंवा त्याहून अधिक झालेली आहे.) अशा विस्तार अधिकारी यांना आ.प्र.यो. चा तिसरा लाभ S 15 / S16 वेतनश्रेणीचा मिळत असून ग्रामपंचायत अधिकारी यांना मात्र संदर्भीय शासन निर्णयाद्वारे तिसरा लाभ S 20 वेतनश्रेणीचा मिळत आहे. तसेच संदर्भीय शासन निर्णयापूर्वी अस्तित्वात असलेल्या ग्रामसेवक पदावरून विभागीय स्पर्धा परीक्षा उतीर्ण होऊन ग्रामविकास अधिकारी झालेले व नंतर पदोन्नती झालेल्या विस्तार अधिकारी (पं) यांचे वेतनश्रेणी मध्ये सुद्धा ग्रामपंचायत अधिकारी यांचे तुलनेत खूप मोठ्या प्रमाणात तफावत निर्माण होऊन संबंधित विस्तार अधिकारी यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

नोंदणी क्र.: NGP 3605 अमरावती

# महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी (पंचायत) संघटना

email id : tpomaharashtra@gmail.com

| श्री. प्रविण गावंडे | श्री. श्रीधर सातपु | श्रीम. उज्वला बने | श्रीम. मिनाक्षी बनसोड | श्री. रामप्रसाद मुंडे | श्री. बालाजी पोतदार |
|---|---|---|---|---|---|
| राज्याध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य कोषाध्यक्ष | राज्य सरचिटणीस |
| मो. 9921441869 | मो. 9423082078 | मो. 9892209863 | मो. 9422152500 | मो. 8668275541 | मो. 8275454488 |

पत्र व्यवहाराचा पत्ता : श्री. प्रविण गावंडे, प्लॉट नं. ८, खरबी रोड, गावंडे कॉन्व्हेंट जवळ, साईबाबा नगर, पंजाब नॅशनल बँक समोर, नागपूर (महाराष्ट्र)- 440034

**कार्याध्यक्ष**

श्री वसंत वाघमारे (नांदेड)

**संघटक**

श्री इंद्रजित काळे(ठाणे)

**लेखा परिक्षक**

श्री ज्ञानेश्वर सुतार (सोलापूर)

**विभागीय अध्यक्ष**

श्री गजानन धर्माळे (अमरावती)
श्री नरेंद्र नागलवाड (छ.सं.नगर)
श्री प्रसाद म्हात्रे (कोकण)
श्री प्रभाकर वाघ (नागपूर)
श्री कपिल वाघ (नाशिक)
श्री सुकदेव साळुंके (पूणे)

**विभागीय सचिव**

श्री भोजराज पवार (अमरावती)
श्री व्ही.बी.कांबळे (छ.सं.नगर)
श्री सुनिल पाटील (कोकण)
श्री शितेज पटले (नागपूर)
श्री पुलकेशी केदार (नाशिक)
श्री माधव बोईनवाड (पूणे)

**विभागीय संघटक**

श्री प्रमोद लोखंडे (अमरावती)
श्री मंगेश कुंटे (छ.संभाजीनगर)
श्री गजानन बडद (कोकण)
श्री सुनिल गावंडे (नागपूर)
श्री डी.जी. सपकाळे (नाशिक)
श्री मनोज जाधव (पूणे)

जा. क्र.　　　　　　　　　　　　　　दिनांक :

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ नुसार "वरिष्ठ पद हे कनिष्ठ पदापेक्षा कमी वेतनश्रेणीचे राहणार नाही" अशी तरतूद असून पदोन्नती मिळालेल्या अधिका-यांचे वेतन अधिनस्त पदाच्या वेतनापेक्षा कमी असणे योग्य वाटत नाही. तसेच पदोन्नती झालेल्या अधिका-यास "Protection of pay" मिळणे आवश्यक आहे, त्यामुळे जर कनिष्ठ कर्मचा-यांचे वेतन वाढून वरिष्ठांपेक्षा जास्त झाले, तर वरिष्ठांच्या वेतनात वाढ करणे गरजेचे आहे. अन्यथा, अधिनस्त पदास उच्च श्रेणी व पदोन्नती पदास कमी श्रेणी ही स्थिती निर्माण होईल. तसेच सदर बाबीमुळे प्रशासकीय कामांवर देखील विपरीत परिणाम पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आणखी असे की, महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम 1967 मधील नियम 9 व 12 नुसार पदोन्नती व वेतन निर्धारण करताना अधिनस्त पदाशी विसंगती राहू नये या करिता अधिनस्त पदाची वेतनश्रेणी सुधारित झाल्यास, पदोन्नती पदाची वेतनश्रेणी त्यास अनुरूप सुधारित करणे आवश्यक आहे.

कृपया, उक्त बाबींचा विचार होऊन विस्तार अधिकारी (पं) यांच्या वेतनश्रेणीत आवश्यक सुधारणा होणेस विनंती आहे.

आपले स्नेहांकित,

राज्य अध्यक्ष　　　　राज्य सरचिटणीस

महाराष्ट्र राज्य विस्तार अधिकारी (पंचायत) संघटना

आजचे प्रयत्न... उद्याचे यश

**प्रतिलिपी**

1 मा विभागीय आयुक्त,(अमरावती/छ.संभाजीनगर/कोकण/नागपूर/नाशिक/पुणे) यांना माहितीस्तव सविनय सादर.

2.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,(सर्व) यांना माहितीस्तव